# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** जुल्का
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0015 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/01/2025 00:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/01/2025
**Time From (वेळेपासून):** 12:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/01/2025 **Time (वेळ):** 00:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/01/2025 00:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मालेगाव ते शेलु बाजार रोड , हटेल साई जवळ ,जउळका बस स्टण्ड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष इराप्पा चौगुले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरदरी बु तामालेगांव जिवाशिम,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरदरी बु तामालेगांव जिवाशिम,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8698778125

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माणिकराव तारासिंग चव्हाण | | | 1. वरदरी बु तामालेगाव जिवाशिम, जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या दोन नोटा व 100 रु दराच्या दोन नोटा एकुण 1200/ रु | 1,200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,200.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यदि दिनांक:-28/01/2025 नाव- श्री.संतोष इराप्पा चौगुले वय 40 वर्ष, व्यवसाय शेती, रा.वरदरी बु. ता. मालेगांव जि.वाशिम मो.नं.8698778125 मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व शेती व्यवसाय करतो, मी दिनांक 17/01/2025 रोजी पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड, लाप्रवि वाशिम यांचे कडे लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे. मी समक्ष तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन माझे वडील नामे श्री.इरप्पा चिमा चौगुले यांचे नावे असलेली शेती जमीन गट क्रमांक 08 मध्ये 6 एक्कर शेती आहे. सदर शेती मध्ये शासनाकडुन विहीर मंजुर झालेली असुन त्याकरीता लागणारे कागदपत्रे व अर्ज मी माझे वडीलाकडुन करून घेवुन ग्रामपंचायत वरदरी येथील ग्रामरोजगार सेवक श्री.माणिक तारासिंग चव्हाण यांच्या कडे दिले होते. माझे वडीलांना वयामानामुळे व तब्बेत ठिक राहत नसल्यामुळे विहीर मंजुरीचे सर्व पाठपुरावा मी त्यांचा मुलगा म्हणुन स्वतः केला आहे. मी, माझे वडीलांच्या नावाने विहीर मिळणे कामी अर्ज ग्रामपंचायत वरदरी येथील ग्रामरोजगार सेवक श्री.माणिक चव्हाण यांना दिल्यानंतर दिनांक 30/06/2023 रोजी आम्हाला विहीर मंजुर झालेली आहे. माहे जानेवारी 2024 मध्ये आमच्या शेतात विहीरीचे काम पुर्ण केले आहे. सदर विहीरीसाठी मी आणि माझे वडील यांनी अगोदर आमच्या कडील रक्कम रूपये 4,00,000 रूपयाचे वर खर्च केलेला आहे. विहीर पुर्ण झाल्यानंतर ग्रामरोजगार सेवक श्री. माणिक तारासिंग चव्हाण यांनी आमच्या विहीरीचे कामाचे मस्टर तयार करून त्यांची रक्कम अंदाजे 1,67,000 रूपये आम्हाला मिळवुन दिलेली असुन बाकी मस्टर हे ग्रामरोजगार सेवक यांना तयार करून पंचायत समिती मालेगांव येथे सादर करायचे होते. सदर मस्टर तयार करून बाकीची रक्कम मिळणेकरीता मी दि.15/01/2025 रोजी ग्रामरोजगार सेवक श्री.माणिक चव्हाण यांना भेटलो असता त्यांनी मला तुमचे मस्टर तयार करून पंचायत समिती मालेगांव येथे पाठवुन रक्कम तुमच्या बॅक खात्यात जमा करण्यासाठी 1200 रूपये दयावे लागतील. मी ग्रामरोजगार सेवक श्री.माणिक चव्हाण यांना 1200 रूपये कशा साठी, मस्टर तयार करण्यासाठी काहीही दयावे लागत नाही असे म्हटल्यावर त्यांनी मला 1200 रूपये दिले नाही तर तुमचे बाकीचे मस्टर तयार करणार नाही व तुम्हाला उर्वरीत रक्कम सुध्दा भेटु देणार नाही. मस्टर तयार करण्याकरीता कोणतीही फि दयावी लागत नसल्याचे मला माहित असल्याने ग्रामरोजगार सेवक श्री.माणिक तारासिंग चव्हाण हे माझेकडे लाचेची मागणी करत असुन 1200 रूपये हि रक्कम लाच मागणी असल्याची माझी खात्री झाली. माझी पैसे देण्याची इच्छा नाही. श्री.माणिक तारासिंग चव्हाण, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत वरदरी यांच्याषी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसुन आपशी दुश्मनी नाही. श्री.माणिक तारासिंग चव्हाण, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत वरदरी यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाई होणेस विनंती आहे."मी वरील प्रमाणे लेखी तक्रार पंचा समक्ष दिली. मी, पंच कर्मचारी यांना माझी तक्रार सांगितली. तसेच पंच कर्मचारी यांनी मी दिलेली लेखी तक्रार वाचली. त्यानंतर पो.नि.तिप्पलवाड यांनी माणिकराव तारासिंग चव्हाण, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत वरदरी यांची प्रत्यक्ष भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावी लागेल असे आम्हाला सांगितले. माणिक चव्हाण, ग्रामरोजगार सेवक यांचे सोबत माझी ग्राम जउळका येथे भेट होणार असल्याने दोन्ही पंच, स्टाफ व मला पडताळणी कारवाई संबंधी सुचना दिल्या. दोन्ही पंच, पो.नि.तिप्पलवाड, लाप्रवि स्टाफ षासकीय वाहनाने व मी माझे मोटर सायकलने मालेगाव येथुन निघुन जउळका येथील रेल्वे गेट जवळ पोहचलो. तिथे पोहचल्यावर पो.नि.तिप्पलवाड यांचे सुचनेवरुन मी माणिक चव्हाण, ग्रामरोजगार सेवक यास फोन लावुन भेटन्यासंबधाने विचारना केली असता. माणिक चव्हाण यांनी मला जउळका बस स्टॅंडवरील हॅाटेलवर भेटण्यास सांगीतल्याने दि.17/01/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान मला, व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देऊन पंच क्र.1 यांचेसह जउळका येथील बस स्टॅण्ड वरील हाटेलजवळ माणिक चव्हाण, ग्रामरोजगार सेवक यांची भेट घेवून त्यांची पडताळणी करणेकरीता पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता, माझी जउळका येथील बस स्टॅण्डच्या जवळ असलेल्या हाटेल येथे माणिक चव्हाण यांचे सोबत भेट होवून माझे विहिरीचे मस्टर काढणे संबधाने बोलणी झाली. माणीक चव्हाण मला म्हटले की, ''मले साहेबाले नाही का

3/5

1200/- रुपये दयायचे....'' त्यावर मी माणिक चव्हाण यास बोललो '' किती ? '' असे म्हटले असता माणिक चव्हाण यांनी ''1200 रुपये'' सांगीतले... मी माणिक चव्हाण यास '' काही कमी जास्त करा '' असे म्हटले. त्यावर माणिक चव्हाण मला म्हटले ''तुही इच्छा असलं सांग'' मी माणिक चव्हाण यास ''तुहया मनांन सांग'' असे म्हटले. त्यावर माणिक चव्हाण मला म्हटले ''1200/- रुपये दया लागलं तुले'' असे म्हणुन माणिक चव्हाण ग्रामरोजगार सेवक यांनी मला 1200/- रुपये लोचेची मागणी केली आहे. मी त्याला माझे पत्नीची तब्येत ठिक झाल्यावर दोन तिन दिवसात पैशाची व्यवस्था झाल्यावर भेटतो असे सांगुन तेथुन पंच क्र.01 सह पो.नी.तिप्पलवाड व स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे मी घडलेली सविस्तर हकिकत सांगीतली.दि.28/01/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान दोन्ही पंच, पो.नि.तिप्पलवाड व लाप्रवि स्टाफ हे ग्राम जउळका येथील रेल्वे गेट जवळ पोहचलो. मी त्या ठिकाणी अगोदरच हजर होतो. पो.नि.तिप्पलवाड यांनी मला, माणिक चव्हाण यांना लाच म्हणुन देण्याकरीता 1200/-रूपये हजर करण्यास सांगितले असता मी लाच रक्कमेसाठी माझे जवळील 500/-रूपये दराच्या 2 नोटा व 100/- रुपये दराच्या 2 नोटा असे एकुण 1200/-रूपये हजर केले. मी रक्कम हजर केल्यानंतर माणिक चव्हाण यांना लाच म्हणुन दयायचे रक्कमेस अ◌ॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पो.नि.तिप्पलवाड यांनी सापळा कार्यवाही संबंधी सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेका◌ॅर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांचे सह रवाना करण्यापुर्वी पो.नि.बालाजी तिप्पलवाड यांनी मला माणिक चव्हाण यांना फोन करुन कुठे आहात अशी विचारण्यास सांगीतले, मी माणिक चव्हाण यांना फोन केला त्यांनी मला सांगीतले की मी,जउळका येथील सेतुवर आहे तेथे तु ये असे सांगीतले. त्यानंतर लाचेचे रक्कमेसह,व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांचे सह मला माणिक चव्हाण यांना लाच रक्कम देण्याकरीता जउळका येथिल सेतुवर पाठविले. त्याप्रमाणे जउळका बसस्टँडं जवळील सेतु परीसरात पंचासह सापळा कारवाईसाठी एसीबी स्टाफ दबा धरुन बसले. जउळका येथील सेतुवर माझी ग्रामरोजगार सेवक माणिक चव्हाण यांची भेट झाली. भेटी दरम्यान माणिक चव्हाण यांनी मला '' पैसे आणले का ? '' अषी विचारणा केली. मी त्यांना माझे गाडीवर घेउन जउळका बसस◌्टॅड जवळ आलो तेथे माझे व ग्रामरोजगार सेवक माणिक चव्हाण यांचेत माझे विहिरीचे मस्टर संबधी बोलणी झाली. माणिक चव्हाण मला म्हटले की, '' मले... 1500 रुपये लागतात भाउ '' त्यावर मी त्यांना अगोदर ठरल्याप्रमाणे 1200/- रुपये देतो असे सांगीतले व 1200/- रुपये माणिक चव्हाण यास देतांना सांगीतले की ''मोजुन घे ''असे म्हटले, त्यावर माणिक चव्हाण यांनी '' काहुन रे 1500 दयायचे होते न '' असे बोलुन 1200/- माझे कडुन स्विकारल्याने मी ठरल्याप्रमाणे पोनि.बालाजी तिप्पलवाड लाप्रवि वाशिम यांना माझे फोनवरुन त्यांच्या फोनवर मिस कॉल करुन लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. पो.नि.बालाजी तिप्पलवाड व स्टाफ यांनी येऊन माणिक चव्हाण.ग्रामरोजगार सेवक यांचे कडून लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त करुन त्यांना ताब्यात घेतले माणिकराव तारासिंग चव्हाण वय- 44 वर्ष , व्यवसाय- ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत वरदरी बु. ता.मालेगाव जि.वाशिम यांनी दि.17/01/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान माझे वडीलांचे नावे मंजुर असलेल्या सिंचन विहीरीचे मस्टर तयार करुन पंचायत समिती मालेगाव येथे पाठवुन रक्कम बँकेत जमा करण्याकरीता मला 1200/- रुपयाची लाचेची मागणी करुन दि.28/01/2025 रोजी सापळा कारवाई 15.23 ते 15.40 वा चे दरम्यान जउळका रेल्वे येथील बस स्टॅड वरील हॉटेल साई जवळ 1200/-रुपये लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद पो.हवा.आसिफ शेख लाप्रवि वाशिम यांनी टकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा मा ठाणेदार सा यांचे आदेशाने नोंद करुन पुढील तपास कामी पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड ला प्र वि वाशीम यांचेकडे देण्यात येते

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pradip rathod(SI (Sub-Inspector)) / 1234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
श्री.नोंवडशीला -चांगुणे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): pradip rathod
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 1234

Convert to Word